महसुली संवर्ग बदलीबाबत.
महाराष्ट्र वित्त व लेखा सेवा गट-ब (राजपत्रित)
सहायक लेखा अधिकारी संवर्ग.

महाराष्ट्र शासन
वित्त विभाग,
मंत्रालय, मुंबई - ४०००३२.
शासन आदेश क्रमांक : सेवाप्र- २०१९/प्र.क्र.८६/कोषा.प्रशा.३
दिनांक :- १०/०२/२०२०.

वाचा :- 1) सामान्य प्रशासन विभाग अधिसूचना क्रमांक एसआरव्ही-२०१५/प्र.क्र.१५६/कार्या-१२, दि.२८.०४.२०१५,दि.१६.०७.२०१५ व दि. १५.०६.२०१७.
2) लेखा व कोषागारे संचालनालय, मुंबई यांचे पत्र क्रमांक संलेको -१२-२०१९/प्रशा राप सलेअ/सअ.१/न.क्र.१२५/ संवर्ग बदली २०१९/८६७/४९८८, दि.२०/१२/२०१९.

**शासन आदेश**

महाराष्ट्र वित्त व लेखा सेवा गट-ब(राजपत्रीत) संवर्गातील खालील विवरण पत्रात नमूद केलेल्या सहायक लेखा अधिकारी यांनी वैद्यकीय कारणास्तव महसूली विभाग बदलीबाबत केलेल्या विनंतीच्या अनुषंगाने, या आदेशान्वये त्यांचा सध्याचा महसूली विभाग बदलून त्यांनी मागणी केलेला महसूली विभाग वाटप करण्यात येत आहे. त्यानुसार महाराष्ट्र शासकीय गट अ व ब (राजपत्रित व अराजपत्रित)मधील सरळसेवेने व पदोन्नतीने नियुक्तीसाठी महसुली विभाग वाटप नियम २०१५ मधील नियम क्र.१२ व १२(अ) व (ब) (क) मधील तरतुदीनूसार खालील विवरणपत्रामध्ये नमूद केलेल्या पदावर संबधित सहायक लेखा अधिकारी यांनी मागणी केलेल्या महसूली विभागात विनंतीने बदली करण्यात येत आहे.

| अ.क्र. | अधिकाऱ्याचे नाव | सध्या कार्यरत असलेले कार्यालय | बदलीने पदस्थापनेचे पद व कार्यालय. |
|---|---|---|---|
| १ | श्रीम. मंजुषा कमलेश बडवे, | सहाय्यक लेखा अधिकारी, महाराष्ट्र जीवन प्राधिकरण मंडळ, ठाणे. | सहायक लेखा अधिकारी, सहसंचालक, व्यवसाय शिक्षण व प्रशिक्षण, नाशिक. |
| २ | श्री. गजानन हरिश्चंद्र माने, | सहाय्यक लेखा परीक्षा अधिकारी, उपसंचालक (मनपा), स्थानिक निधी लेखा परीक्षा, उपविभाग ३, औरंगाबाद. | उपकोषागार अधिकारी, उपकोषागार कार्यालय, मिरज. |
| ३ | श्री. अशोक भिकाजी कांबळे, | सहाय्यक लेखा अधिकारी, महिला व बाल विकास आयुक्तालय, महाराष्ट्र राज्य, पुणे | सहाय्यक लेखा अधिकारी, न्यायाधीश मोटार अपघात, मुंबई शहर. |

२. उपरोक्त सहायक लेखा अधिकारी यांना बदलीच्या पदावर हजर होण्याकरीता त्यांच्या नियंत्रक अधिकाऱ्यांनी तात्काळ कार्यमुक्त करावे व संबंधितांनी कार्यमुक्त झाल्यानंतर बदलीच्या पदावर तात्काळ रुजू व्हावे.

३. सदर अधिकाऱ्यांनी बदलीच्या पदावर हजर होताच संचालक, लेखा व कोषागारे मुंबई यांना अवगत करावे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांचे आदेशानुसार व नावाने.

(शुभांगी शेठ)
सह सचिव, महाराष्ट्र शासन.

प्रति,

१) संचालक, लेखा व कोषागारे संचालनालय, मुंबई.
२) महालेखापाल-१/२ (लेखा व अनुज्ञेयता /लेखा परीक्षा), महाराष्ट्र, मुंबई / नागपूर.*
३) संबंधित अधिकाऱ्याचे सध्याचे कार्यालय प्रमुख*
४) संबंधित अधिकारी*
५) कक्ष अधिकारी, कोषा.प्रशा.१,२ व निवडनस्ती कोषा.प्रशा.३, वित्त विभाग, मंत्रालय, मुंबई.
( *संचालक, लेखा व कोषागारे संचालनालय, मुंबई यांचेमार्फत)